दि. 02/02/2023

1) लोकमत पान क्र. 8

# पत्नीनेच दिली पतीच्या हत्येसाठी सुपारी

## आरोपींना ४८ तासांत अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पत्नीनेच पतीच्या हत्येची एक लाखाची सुपारी दिल्याचे उघड झाले आहे. सुपारी देणाऱ्या पत्नीसह तीन आरोपींना ४८ तासांत अटक करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पोलिसांना यश आले आहे, अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. ही हत्या अनैतिक संबंधातून झाली असल्याची चर्चा असल्याने पोलिस त्याच दृष्टीने तपास करत आहेत.

२७ जानेवारीला संध्याकाळी नायगाव रिक्षा स्टँडजवळील ब्रिजखाली खाडीच्या पाण्यात एका व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने खाडीत फेकून दिल्याने फुगलेल्या, कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या मृतदेहाची ओळख पटविणे व आरोपींचा शोध घेणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलिस निरीक्षक शाहुराज रणवरे यांनी पाच पथके तयार केली होती. पोलिस आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाण्यांतील मिसिंग रजिस्टर तपासले. मात्र, काहीही माहिती प्राप्त न झाल्याने मुंबई, ठाणे व नवी मुंबईतील पोलिस ठाण्यांतील मिसिंग रजिस्टर चेक केले. यातील मृताने परिधान केलेल्या कपड्यांचे वर्णन मुंबईतील बांगूरनगर पोलिस ठाण्यात मिसिंग व्यक्तीच्या कपड्याशी जुळले. त्याचे नाव कमरुद्दीन मोहम्मद उस्मान अन्सारी (३५) हे असल्याचे निष्पन्न केले.

### पैशांच्या हव्यासापोटी केला प्रकार

- गोरेगाव येथे राहणाऱ्या कमरुद्दीन यांच्या शेजारी राहणारे आरोपी बिलाल उर्फ मुल्ला पठाण (४०), त्याची पत्नी सोफिया पठाण (२८) हे घटना घडल्यापासून परिसरातून निघून गेल्याची माहिती मिळाली.
- ते वापी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यांना त्या ठिकाणावरून ताब्यात घेऊन सखोल चौकशी केल्यावर त्यांनी पैशाच्या हव्यासापोटी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.
- तसेच पतीच्या हत्येसाठी प्रेरणा देणारी त्याची पत्नी आशिया अन्सारी हिला वालीव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

2) लोकमत पान 8

# तरुणाची हत्या; एक अटकेत

**मीरा रोड :** मीरा रोडमध्ये सोमवारी अंकुश राज या २० वर्षीय तरुणाच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी बुधवारी आणखी एका आरोपीला अटक केली. अमान हबीब लदाफ (२०) असे त्याचे नाव आहे. तो स्वतःहून पोलिसांना शरण आला. तर मंगळवारी अटक केलेल्या नऊ आरोपींना ठाणे न्यायालयाने १० फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. गुन्हे शाखा कक्ष १, मीरा रोड व काशिमीरा पोलिसांनी हत्येनंतर अवघ्या काही तासांत आयुषसह त्याच्या अन्य आठ साथीदारांना अटक केली होती.

3) लोकमत पान 8

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**नालासोपारा :** नालासोपारा येथे एकवीस वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. काजूपाडा येथील मधुबालजी जसवंत चाळ येथे राहणाऱ्या रतनलाल प्रजापती यांनी मंगळवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणावरून साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर त्याला महापालिकेच्या नालासोपारा येथील रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत्यू घोषित केले. मंगळवारी तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

4) लोकमत पान 8

# घरफोडीत दागिन्यांची चोरी

**नालासोपारा :** नालासोपारा येथे घरफोडीत मोबाइल व सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. बिलालपाडा येथील प्रेमा निवासमध्ये राहणाऱ्या लालमनी यादव (३१) याच्या घरी २८ जानेवारीला रात्री चोरट्यांनी दरवाजाची कडी उघडून आत प्रवेश करत दोन मोबाइल व अर्धा तोळ्याची सोन्याची चेन असा २१ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. मंगळवारी पेल्हार पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

5) पुण्यनगरी पान क्र. 5

दि. 02/02/2023

# बांधकाम साहित्य चोरणाऱ्या चौघांना अटक



**वसई :** वालीव पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या पुलाचे लोखंडी सामान चोरून नेणाऱ्या चौकडीस बेड्या ठोकण्यात वसई गुन्हे शाखेला यश आले असून त्यांच्या कडून हजारोंचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नायगाव पूर्व येथे पुलाच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारे एमएस प्लेट व्हर्टिकल, लेझर, सोल्जर, बेस जॅक असे एकूण ८३ हजारांचे लोखंडी साहित्य ५ जानेवारीला चोरीला गेले होते. याबाबत फिर्यादी गनी मोहम्मद मेमन यांनी दिलेल्या तक्रारीवरून वालीव पोलीस ठाण्यात ८ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कंपनी परिसरातील तसेच चालू बांधकामाच्या ठिकाणी रात्री-अपरात्री लोखंडी वस्तूंच्या चोरीच्या गुन्ह्यांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ झाल्याने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष २, वसईमधील अधिकारी व अंमलदार यांनी माहिती मिळवून आरोपी आसिक सलाम खान, अब्दुल कलाम सलाम खान, मोहम्मद कासिम मोहम्मद हसन खान, सज्जन अली अहमद रसीद यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी चोरी केल्याचे कबूल केले. आरोपीकडून गुन्ह्यातील चोरलेले लोखंडी साहित्य, वापरलेले वाहन असा एकूण ६,४७,६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

6) लोकसत्ता पु. पान.1

# वर्षभरात वसई, भाईंदरमध्ये महिलांवर वाढते अत्याचार

## वर्षभरात बलात्कार ३५७ तर विनयभंगाचे ५४६ गुन्हे

**बलात्कार**

| वर्ष | एकूण गुन्हे | उघडकीस |
|---|---|---|
| २०२१ | २९७ | २९७ |
| २०२२ | ३५७ | ३५६ |

**विनयभंग**

| वर्ष | एकूण गुन्हे | उघडकीस |
|---|---|---|
| २०२१ | ४१४ | ४०२ |
| २०२२ | ५४६ | ५२४ |

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार आणि मीरा-भाईंदर शहरातील महिला अत्याचारांच्या घटना वाढत आहेत. २०२२ या वर्षात बलात्काराचे तब्बल ३५७ तर विनयभंगाचे ५४६ गुन्हे दाखल झाले आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण जास्त असले तरी गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाण ९६ टक्के आहे.

बहुतांश प्रकरणात आरोपी हे पीडित महिलांच्या परिचयाचे आहेत. अल्पवयीन मुलींवर बलात्काराचे प्रमाणदेखील मोठे आहे. यामध्ये समाजमाध्यमावरून ओळख करून मैत्री करून झालेले बलात्कार, लग्नाचे आमिष दाखवून झालेले बलात्कार आहेत. अल्पवयीन मुलींना फूस लावून प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित केले जातात. अशा प्रकरणात पीडितांच्या कुटुंबीयांनी तक्रार दिली तर बलात्काराचा गुन्हा दाखल होतो, अशी माहिती पोलिसांनी दिली. २०२२ या वर्षात विनयभंगाचे ५४६ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी ५२४ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले. गुन्ह्यांचे उकल करण्याचे प्रमाण हे ९६ टक्के



आहे. छेडछाड करणे, पाठलाग करणे, अश्लील शिवीगाळ करणे, अश्लील संदेश पाठवणे अशा प्रकरणातही इतर कलमांप्रमाणे विनयभंगाचे गुन्हे दाखल केले जात आहेत. त्यामुळे गुन्ह्यांची संख्या वाढत असल्याचे पोलिसांनी सांगितले. अनेक प्रकरणात महिलांना अशा प्रकारांना सामोरे जावे लागते. त्यामुळे आम्ही नियमानुसार विनयभंगाचे कलम ३५४ तसेच ३५४ डी अंतर्गत गुन्हे दाखल करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. २०२१ मध्येदेखील विनयभंगाचे ४१४ गुन्हे दाखल होते. त्यापैकी ४०२ गुन्हे उघडकीस आणले होते. त्याचे प्रमाण ९७ टक्के एवढे होते.

CS CamScanner

दि. 02/02/2023

7) पुण्यनगरी पान क्र. 5

# मीरा-भाईंदरमधील महिलांची सुरक्षा केवळ २५ महिला पोलिसांच्या हाती

। नामदेव काशिद

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात सहा पोलीस ठाणी आहेत. या पोलीस ठाण्यांत दररोज महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या अनेक तक्रारी दाखल होत असतात; परंतु त्यांचे निवारण करण्यासाठी महिला पोलीस कर्मचारी उपलब्ध असणे गरजेचे आहे. मात्र मीरा-भाईंदर शहरात महिला पोलिसांची संख्या कमी प्रमाणात आहे. त्यामुळे महिलांची मोठी गैरसोय होत आहे. मीरा-भाईंदर शहरातील महिलांची सुरक्षा केवळ २५ महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या हातात आहे. यामध्ये ६ महिला पोलीस अधिकारी व १९ अंमलदार ते फौजदार पदावर कार्यरत आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाला स्थापना होऊन दोन वर्षे झाली आहेत. या पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मीरा-भाईंदर शहरात ६ व वसई-विरार शहरात ७ पोलीस ठाणी आहेत. या पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाली तेव्हा ३,३३१ पदांना मंजुरी देण्यात आली होती. त्यात ४२६ अधिकारी आणि २,९०५ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता; परंतु २७२ पोलीस अधिकारी आणि १,३९८ कर्मचारी उपलब्ध झाले. त्यावेळी १,६७० पोलिसांच्या जागा रिक्त होत्या. दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात रिक्त पदे भरण्यात आली असली तरी अद्यापही ३० टक्क्यांप्रमाणे महिला पोलिसांच्या राखीव असलेल्या ९९९ पदांपैकी फक्त २५३ रिक्त पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळे आयुक्तालयात महिला पोलिसांची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. यामुळे कार्यरत असलेल्या महिला पोलिसांवर कामाचा मोठा ताण पडत आहे. यापैकी मीरा-भाईंदर शहराचा विचार केला तर शहरातील सहा पोलीस ठाण्यांत ९५ अधिकारी आणि ३६८ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. या सहा पोलीस ठाण्यांमध्ये फक्त २५ महिला पोलीस उपलब्ध आहेत. भारतीय कायद्यानुसार, महिला गुन्हेगारांना अटक करण्यासाठी, महिलांना न्यायालयात घेऊन जाण्यासाठी, पीडित महिलेची तक्रार नोंदवण्यासाठी तसेच महिलांच्या वैद्यकीय तपासणीसाठी महिला पोलीसच असणे बंधनकारक आहे. पोलीस ठाण्यात महिला पोलिसांची कमतरता असल्यामुळे या कामास उशीर होतो किंवा ते काम उपस्थित असलेल्या महिला पोलिसांना पूर्ण करावे लागते. मीरा-भाईंदरच्या नवघर ४, भाईंदर ४, नयानगर ३, मीरा रोड ४, काशिमीरा ९, उत्तन १ या पोलीस ठाण्यांत महिला पोलीस कार्यरत आहेत.

> “ मीरा-भाईंदर पोलीस ठाण्यातील कमी असलेल्या महिला पोलिसांची आवश्यक असलेली पदे भरण्यासाठी नव्याने भरती प्रक्रिया राबवली जात आहे. भरती प्रक्रिया पूर्ण होताच महिला पोलीस उपलब्ध होणार आहेत. आवश्यक काम असल्यास इतर पोलीस ठाण्यांतून महिला पोलिसांची मदत घेऊन काम पूर्ण केले जाते.
>
> – जयवंत बजबळे, उपायुक्त परिमंडळ १ (मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय)

CamScanner

CamScanner

दि. 02/02/2023

1) सकाळ पू. पान क्र. 3

# जोशी रुग्णालयाचे खासगीकरण

## ‘श्रमजीवी’चा विरोध; पीपीपी तत्त्वावर चालविण्याचा प्रस्ताव

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी हे सरकारी रुग्णालय खासगी लोक सहभागातून (पीपीपी) चालविण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. आमदार गीता जैन यांनी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांची भेट घेऊन तसा प्रस्ताव त्यांच्याकडे सादर केला आहे. आरोग्यमंत्र्यांनीही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मात्र रुग्णालयाच्या खासगीकरणावरून शहरातील वातावरण चांगलेच तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. श्रमजीवी संघटनेने या खासगीकरणाला कडाडून विरोध केला असून रुग्णालय खासगीकरणाविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे सध्या राज्य सरकारच्या माध्यमातून चालविण्यात येत आहे. पण दोनशे खाटांच्या या रुग्णालयात आजही अत्याधुनिक आरोग्य सेवा नागरिकांसाठी उपलब्ध नाहीत. रुग्णालयात अनेक तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे. रुग्णालयासाठी मंजूर असलेल्या डॉक्टरांसह अन्य पदांपैकी केवळ पन्नास टक्के पदेच भरण्यात आली आहेत. रुग्णालयात काम करणारे डॉक्टर, परिचारिका तसेच अन्य कर्मचाऱ्यांना तीन तीन महिने पगार मिळत नाही. एवढेच नाही तर रुग्णालयात पुरेशा प्रमाणात सफाई कर्मचारी उपलब्ध नाहीत, अशी या रुग्णालयाची दुरवस्था झाली आहे. यामुळे रुग्णालय बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने हे रुग्णालय ठाणे महापालिकेच्या धर्तीवर खासगी लोक सहभाग या तत्त्वावर खासगी संस्थेला चालविण्यासाठी द्यावे, असा प्रस्ताव मिरा भाईंदरच्या आमदार गीता जैन यांनी राज्य सरकारला दिला आहे. खासगी संस्थेला रुग्णालय चालविण्यास दिले तर रुग्णालयाला संजीवनी मिळेल व नागरिकांना मोफत, तसेच सरकारी दरात अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असे जैन यांचे म्हणणे आहे. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्याकडे यासंदर्भात नुकतीच एक बैठक पार पडली. आरोग्यमंत्र्यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जैन यांच्या व्यतिरिक्त आरोग्यमंत्र्यांकडे आणखी एक प्रस्ताव सादर झाला आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्र्यांनी रुग्णालयाच्या खासगीकरणासंदर्भात तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.



**भाईंदर** : भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाची इमारत.

### तीव्र आंदोलनाचा इशारा

पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाचे खासगीकरण करून या लोकांचा मोफत उपचाराचा अधिकार हिरावून घेत आहे. एखाद्या खासगी ठेकेदाराच्या ताब्यात शासकीय रुग्णालय दिल्यास प्रत्येक उपचारासाठी आणि औषधासाठी गरिबांना पैसे द्यावे लागतील. यामुळे रुग्णालय खासगीकरणाच्या प्रस्तावाचा निषेध करत असून या प्रस्तावाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा श्रमजीवी संघटनेने दिला आहे. याव्यतिरिक्त जोशी रुग्णालयात असलेल्या रुग्णकल्याण समिती सदस्यांनी देखील खासगीकरणाला विरोध केला आहे.

कर्करोग शस्त्रक्रिया, कार्डियाक आणि कार्डिऑथोरासिक शस्त्रक्रिया, पोट व जठर शस्त्रक्रिया, अस्थिरोग शस्त्रक्रिया, यांसारख्या बाराशे महत्त्वाच्या शस्त्रक्रिया शहरातील नागरिकांना भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात मोफत उपलब्ध होतील. तसेच गोरगरिबांना मोफत तर श्वेत शिधापत्रिकाधारकांना सरकारी दरात उपचार मिळणार आहेत. अधिकाऱ्यांकडून प्रस्ताव आल्यावर तो तात्काळ संमत करण्याचे आश्वासन आरोग्यमंत्र्यांनी दिले आहे.

**- गीता जैन**, आमदार

रुग्णालय खासगीकरणाविरोधात ६ ते १९ फेब्रुवारीदरम्यान श्रमजीवी संघटना रस्त्यावर उतरून ‘भीक मांगो आंदोलन’ करणार आहे. जमलेले सर्व पैसे २० फेब्रुवारीला राज्य सरकारला पाठविण्यासाठी तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

**- सुलतान पटेल**, श्रमजीवी संघटना

रुग्णालय खासगीकरणाचा निर्णय दुर्दैवी आहे. एकीकडे शहरात नवीन सरकारी रुग्णालय बांधण्याची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे आणि दुसरीकडे सुरू असलेले भाईंदर येथील सरकारी रुग्णालयाचे खासगीकरण केले जाणार आहे. हे परस्परविरोधी असून नवीन रुग्णालयासाठी राज्य सरकार देणार असलेला निधी पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाकडे वळविणे गरजेचे आहे.

**- ओमप्रकाश गाडोदिया**, सदस्य, रुग्णकल्याण समिती

CS CamScanner

CS CamScanner

MHT
मुंबई
# हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, गुरुवार 2 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347

वसई-विरार में आत्महत्या की संख्या बढ़ी ...पेज-3

प्यार, धोखे और राजनीति के बीच फंसा यामी गौतम का किरदार ...पेज-6

आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त 7.12am 6.32pm | आज का मौसम | तापमान अधिकतम 32°C न्यूनतम 23°C | शेयर बाजार NSE BSE | सराफा बाजार

# पत्नी ने दी थी पति की सुपारी

## पुलिस में कराई थी झूठी मिसिंग शिकायत

## मामला दर्ज होने 48 घंटे में हत्या की गुत्थी सुलझाई



विरार। क्राइम ब्रांच यूनिट 2 टीम ने 22 जनवरी को नायगांव में हुई कमरुद्दीन मोहम्मद उस्मान अंसारी नामक युवक की हत्या की गुत्थी सुलझा ली है। क्राइम ब्रांच ने इस मामले में आरोपी पति-पत्नी को गुजरात के वापी से गिरफ्तार किया है। इस मामले में कुल 3 आरोपियों की गिरफ्तारी हुई है।

### इलाज के बहाने ले आए थे नायगांव

बुधवार की दोपहर परिमंडल 2 मीरा-भयंदर-वसई-विरार के क्राइम उप आयुक्त अविनाश अंबुरे ने प्रेष परिषद में बताया कि क्राइम ब्रांच ने वसई-विरार, मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक और आसपास से कइयों पुलिस स्टेशनों में गुमशुदा व्यक्तियों की छानबीन शुरू की। इस दरम्यान टीम ने मृतक की शिनाख्त की जो गोरेगांव का रहने वाला था, उसकी पत्नी ने बांगुरनगर पुलिस थाने में गुमशुदगी की रिपोर्ट दर्ज कराई गई थी। इस वारदात को अंजाम देने के लिए मृतक अंसारी की पत्नी ने आरोपियों को एक लाख रुपये की सुपारी दी थी। जिसके बाद 22 जनवरी दोपहर आरोपी बिलाल उर्फ मुल्ला निजाम पठान व उसकी पत्नी सौफिया पठान ने कमरुद्दीन अंसारी को इलाज के बहाने नायगांव में एक बाबा के पास जादू टोना करने के लिए ले आए और स्टेशन से कुछ ही दूरी पर ब्रिज के नीचे बिलाल ने उसके सिर पर सिलबट्टा से तीन बार वार किया। इस बीच अंसारी किसी तरह जान बचा भगाने लगा तो बिलाल ने उसे पकड़ा और उसकी गर्दन पर चाकू से वार कर उसकी हत्या कर दी और शव को खाड़ी में फेंक दोनों फरार हो गए।

### वापी से दोनों को किया गिरफ्तार

इधर अंसारी की पत्नी ने गोरेगांव के बांगुर नगर पुलिस स्टेशन में उसकी झूठी मिसिंग कम्प्लेट कर दी। 27 जनवरी को वालीव पुलिस ने अंसारी का शव खाड़ी से बरामद कर पोस्टमार्टम के लिए जेजे अस्पताल भेजा। पोस्टमार्टम रिपोर्ट से पता चला कि उसकी हत्या की गई है। जिसके बाद वालीव पुलिस ने 30 जनवरी को अज्ञात लोगों पर हत्या का मामला दर्ज किया कर क्राइम ब्रांच यूनिट 2 की टीम ने मोबाइल लोकेशन के आधार पर आरोपी पति-पत्नी को वापी से गिरफ्तार कर लिया। वहीं वालीव पुलिस ने मृतक की पत्नी को गिरफ्तार किया है। वापी जाकर आरोपी बिलाल उर्फ मुल्ला निजाम पठान (40), पत्नी सौफिया बिलाल पठान (28) को हिरासत में लिया। उन्हें विश्वास में लेकर पूछताछ की तो पैसे के लालच में उक्त अपराध को अंजाम दिया था।

### वालीव पुलिस स्टेशन में मिसिंग दर्ज

27 जनवरी 2023 की शाम 4 बजे के आसपास नायगांव रिक्शा स्टैंड के ब्रिजे के नीचे एक 40 से 45 वर्षीय व्यक्ति की लाश मिलने की खबर वालीव पुलिस को मिली थी, जिसके बाद पुलिस ने शव को कब्जे में लेकर पोस्टमार्टम हेतु भेज व सीआरपीसी धारा 174 के तहत केस दर्ज किया था।

पोस्टमार्टम से पता चला कि शव के शरीर पर किसी हथियार से वार कर हत्या की गई है। इस मामले में पुलिस ने एफआईआर दर्ज कर धारा 302 व 201 के तहत केस दर्ज किया था।

CS CamScanner

वसई-विरार में आत्महत्या की संख्या बढ़ी

...पेज-3


MHT

मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक



प्यार, धोखे और राजनीति के बीच फंसा यामी गौतम का किरदार

...पेज-6


मुंबई, गुरुवार 2 फरवरी 2023

संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-, अंक- | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | सहसंपादक: राजन पांडेय / सुमित आचार्य


| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| माघ शुक्ल पक्ष त्रयोदशी | 7.12am 6.32pm | सुबह मौसम में हल्की नमी रहेगी। दिन में तापमान बढ़ने की संभावना | अधिकतम 32°C न्यूनतम 23°C | NSE OPEN 17,811.60 \| CLOSE 17,616.30 BSE OPEN 59,549.09 \| CLOSE 59,708.08 | GOLD 57,820 Per 10 Gm SILVER 71,300 Per Kg |

# लोहा चोरी करने वाले गिरोह के 4 सदस्य गिरफ्तार




**वसई।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच परिमंडल-2 वसई ने कंपनी परिसर व निमार्णाधीन स्थलों से लोहा चोरी करने वाले अपराधियों के गिरोह को गिरफ्तार किया है। पुलिस के मुताबिक हरिमाये कंपनी परिसर व चल रहे निर्माण स्थलों पर रात-दिन लोहे सामग्री की चोरी की संख्या बढ़ रही थी, इसी बीच क्राइम ब्रांच ने उक्त चोरी पर रोक लगाने के लिए घटना स्थल के सीसीटीवी फुटेज की जांच कर मुखबिरों के माध्यम से जानकारी प्राप्त की। चोरी की समानांतर जांच के दौरान दोषियों को नामजद किया, पुलिस ने यह भी बताया कि यह लोग भंगार लेने के बहाने कंपनी परिसर में जाकर लोहे की चोरी करते थे। अभियुक्तों को वालीव पुलिस स्टेशन में दर्ज धारा 379, 34 के तहत गिरफ्तार किया है।

मामले में आरोपियों के नाम असिक सलाम खान ( 45), अब्दुल कलाम सलाम खान (46 ) , मोहम्मद कासिम मोहम्मद हसन खान (49), सज्जन अली अहमद रसीद (26) को गिरफ्तार किया है।

इनकी गिरफ्तारी से 6 अपराधों की गुत्थी सुलझी है। तथा इनके पास से 6,47,600 रुपये का माल जब्त किया गया है।

CamScanner

पोलीस भरतीसाठी आलेल्यांसाठी निवास व्यवस्था, पोलिसांकडून मार्गदर्शन

# महिला उमेदवार तणावमुक्त



जिल्ह्यासह राज्यभरातून महिला उमेदवार येणार

# वसई -विरार महापालिका निवडणूक ताकदीनिशी लढणार



# वसईच्या प्रवासाला गतिरोधकांचा अडथळा

आवश्यक सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित; दुर्घटनेनंतर पाच वर्षांनी पुन्हा सज्ज

# डहाणू किनाऱ्यावर पर्यटकांसाठी बोट सफर



पर्यटकांसाठी सुविधा आवश्यक

# कर्करोगावरील संशोधनाला भरपूर वाव : डॉ. जेम अब्राहम

# २०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी



# कुपोषण समूळ नष्ट करण्यासाठी टास्क नेमा



# आरएमसी प्लांटचे प्रदूषण मिरचीसाठी तिखट



# वसई-विरार महापालिकेचे कर्मचारी रस्त्यावर



लोकमत

# वसईतील जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नवघर येथील हरी ओम चेंबरमधील तिसऱ्या मजल्यावर अनधिकृतपणे जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती माणिकपूर पोलिसांना सोमवारी दुपारी साडेचारच्या सुमारास मिळाली होती. त्यानुसार त्या ठिकाणी पोलिसांनी कारवाई केली असता जुगार अड्डा मालक, ६ जॉकी व १६ जुगारी असे एकूण २३ जण कॉइन्स, पत्ते व रोख रक्कम घेऊन जुगार खेळताना रंगेहाथ आढळून आले होते. एकूण २३ जणांकडून १ लाख ४२ हजाराचे १८९ कॉइन्स व १४ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. माणिकपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Feb 01, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# अमली पदार्थ पिणारे जेरबंद

नालासोपारा : पेल्हार पोलिसांनी सोमवारी संध्याकाळी तुंगारेश्वर मंदिराच्या जवळील परिसरात अंमली पदार्थ पिणाऱ्या सहा आरोपींना पकडले आहे. रितेश साळुंखे (वय २२), सुयोग कोरगावकर (३२), समीर सावंत (३०), सचिन मिश्रा (२५), शिवम मिश्रा (२६) आणि सुमित घटाड (२५) अशी पकडलेल्या सहा आरोपींची नावे आहेत. पेल्हार पोलिसांनी वेगवेगळे सहा गुन्हे दाखल करून सहाही आरोपींना अटक केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Feb 01, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner